पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ७७**
(सभावृत्तांत)

**दिनांक – २१/०८/२०१८** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २१/०८/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.राजू मिसाळ
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.आंगोळकर सागर सुनिल
५. मा.करुणा शेखर चिंचवडे
६. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
७. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
८. मा.डोळस विकास हरिश्चंद्र

याशिवाय मा.आष्टीकर – प्र.अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.चितळे, - सहाय्यक आयुक्त, मा.बोदडे, मा.राऊत, मा.दांगट, मा.खोत – प्र.सहाय्यक आयुक्त, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.सवणे, मा.जुंधारे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.भोसले, मा.घुबे, मा.देशमुख - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.१२) स्वमग्न मुलांची (Autistic Children) पहिल्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी मनपामार्फत मदत देणेबाबत – मा.विकास डोळस, मा.विलास मडिगेरी यांचा प्रस्ताव

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे दि.१६/८/२०१८ रोजी दु:खद निधन झाले असल्याने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहून आजची मा.स्थायी समितीची सभा दि.२९/८/२०१८ रोजी दु.१.३० पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

----------

मा.सभापती – बुधवार दि.२९/८/२०१८ रोजी दु.१.३० वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिति
**कार्यपत्रिका क्रमांक – ७७**
(सभावृत्तांत)
(दि.२१/०८/२०१८ ची तहकूब सभा)

**दिनांक – २९/०८/२०१८** **वेळ – दुपारी १.३० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.२१/०८/२०१८ ची तहकूब सभा बुधवार, दिनांक २९/०८/२०१८ रोजी दुपारी १.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.राजू मिसाळ
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.लोंढे नम्रता योगेश
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१०. मा.लांडगे सारिका संतोष
११. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१२. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३. मा.बारणे अर्चना तानाजी
१४. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१) मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.लांडे – मुख्य लेखापाल, मा.तुपे, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.खोराटे, मा.दुरगुडे,

मा.इंदलकर, मा.झगडे - सहाय्यक आयुक्त, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.राऊत, मा.दांगट, मा.खोत – प्र. सहाय्यक आयुक्त, मा.पवार – प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.कांबळे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.मोरे, मा.घुबे, मा.सुपेकर, मा.देशमुख, मा.धानोरकर - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.माने – पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक १४/०८/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ७६)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ३०७० विषय क्रमांक - ०१
दिनांक – २९/०८/२०१८ विषय - क्रिडा
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.कांबळे आंबरनाथ, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक सभा ठराव क्र.२५ दि.२७/७/२०१८ अन्वये प्रभाग क्र.१३ मधील यमुनानगर बॅटमिंटन हॉल ११ वर्षाच्या कराराने प्रभागातील क्रांतिवीर मित्र मंडळ यासंस्थेस मनपाचे पिंपळे गुरव, सांगवी या ठिकाणचा बॅटमिंटन हॉल कराराच्या धर्तीवर चालविण्यासाठी देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०७१ विषय क्रमांक - ०२
दिनांक – २९/०८/२०१८ विषय– यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. वायसीएमएच/कावि/८ड/१८५/२०१८ दि.०६/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयात नियोजीत पदव्युत्तर संस्थेमध्ये सध्या कार्यरत असलेले सहाय्यक प्राध्यापक (सर्वसाधारण शल्य चिकीत्सा), डॉक्युमेंट लिस्ट, कॅटालॉगर व कोडींग क्लर्क यांना एकत्रित मानधनावर एक दिवस सेवा खंडीत करुन ६

महिने करीता मुदत वाढ देऊन तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करावयाची आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | नाव | पदनाम | एकत्रित मानधन (वेतनश्रेणी नुसार) |
|---|---|---|---|
| १ | डॉ. अमित अनंत वाघ | सहाय्यक प्राध्यापक (सर्वसाधारण शल्यचिकीत्सा) | १५६००-३९१०० ग्रेड पे ६०००/- |
| २ | श्रीम. पौर्णिमा राहूल कांबळे | डॉक्युमेंटलिस्ट | ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००/- |
| ३ | श्रीम.रोहिणी शांताराम पोकळे | कॅटालॉगर | ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००/- |
| ४ | श्री. नवनाथ गोकूळ शिंदे | कोडींग क्लर्क | ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००/- |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये वैद्यिकय क्षेत्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणेबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे.नियोजित पदव्युत्तर संस्थे करीता अत्यावश्यक पदे ३६४ दिवसांच्या कालावधीसाठी भरणेकरीता दि.१८-०३-२०१७ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन दि.३०-०३-२०१७ रोजी मुलाखती आयोजित करणेत आलेल्या होत्या. सदर पदे भरणेकरिता मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१४८, दि.१२-०४-२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे. दि.३०-०३-२०१७ रोजी आयोजित मुलाखतीमधुन निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी दि.०९-०८-२०१७ रोजी प्रसिध्द करणेत आलेली आहे. त्यानुसार निवड करणेत आलेल्या उमेदवारांना मा.आयुक्त यांचे कडील आदेश क्र.वैद्य/३/कावि/९७८/२०१७, दि.२३/०८/२०१७ मधील विहित अटी व शर्तीचे अधीन राहून आदेशाच्या दिनांकापासून ३६४ दिवसांचे कालावधीकरीता पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपात दिनांक २९/०८/२०१८ पर्यंत नेमणूक दिलेली आहे. सदर आदेशातील कर्मचा-यांची ३६४ दिवसांची मुदत दि.२९/०८/२०१८ रोजी पुर्ण होत आहे. वर नमूद कर्मचा-यांची संस्थेच्या कार्यालयीन कामा करीता आवश्यकता आहे. त्यामूळे सदर कर्मचा-यांचे पूर्वीचे नेमणूक आदेश क्र.वैद्य/३/कावि/९७४/२०१७, दि.२३/०८/२०१७ मधील अटी व शर्ती कायम ठेऊन महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीसीसी-३०१३/प्र.क्र.६०१/नवि-२२, दि.४ मार्च २०१४ चे सोबतचे परिशिष्ट मध्ये नमूद केलेल्या वेतनश्रेणी (ग्रेड पे) देऊन एकत्रित मानधनावर त्यांची पुढील ६ महिन्या करीता नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०७२ | विषय क्रमांक - ०३
दिनांक – २९/०८/२०१८ | विषय – अभिलेख कक्ष
सूचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. अभि/२/कावि/३१४/२०१८ दि.१३/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५, महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००७ व पिंपरी चिंचवड महानगरपालिका उपविधी २००३ नूसार सर्व विभागाचे अभिलेख वर्गीकरणाप्रमाणे जतन होणे आवश्यक आहे. त्यानूसार महानगरपालिकेच्या अभिलेख कक्षामध्ये अभिलेखाचे A ,B, B1, C, D याप्रमाणे सर्व विभागाचे वर्गीकरण कामकाज सुरु आहे. सदर कामकाजाची माहिती असलेल्या शासन सेवेतील श्री ए.ए.शेख. सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांच्या अभिलेखापाल पदावरील नेमणूकीस आदेश क्रं.अभिकक्ष/१/कावि/२१२ दि.२/०४/२०१८ अन्वये सहा महिने कालावधीसाठी रू.१७,०००/- इतक्या एकत्रित मानधनावर नियुक्ती देण्यात आली होती. त्यांची मुदत ३१/८/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे. अभिलेख कक्षासाठी अभिलेखपाल पद निर्माण करण्यात आलेले नाही. प्रस्तावात नमूद केल्यानुसार अभिलेख व्यवस्थापनाचे काम नियमीत करावयाचे आहे तसेच दि.१५/०२/२०१८ च्या शासन निर्णयानवये शासनाने सर्व महापालिका कार्यालयामध्ये झिरो पेंडन्सी अँड डेली डिस्पोजल ही मोहिम राबविण्याबाबत निर्देश दिले असल्याने त्याची ही अंमलबजावणी करावयाची आहे. त्यामुळे मानधनावरील नेमणूकीस मुदतवाढ देणे आवश्यक आहे. सबब, अभिलेख कक्षाचे कामकाजासाठी श्री.ए.ए.शेख सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांच्या नियुक्तीस दिनांक १/०९/२०१८ पासून सहा महिने कालावधीसाठी दरमहा र.रु.१७,०००/- इतक्या या पूर्वीच्याच एकत्रित मानधनावर मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०७३ | विषय क्रमांक - ०४
दिनांक – २९/०८/२०१८ | विषय – ब क्षेत्रिय कार्यालय
सूचक – मा.यशोदा बोईनवाड | अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. बक्षेका/४/कावि/३८६/२०१८ दि.१३/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क्षेत्रीय अधिकारी यांनी ११ महिने कालावधीकरिता फक्त भाजी मंडई, व्यापारी गाळे, वाहनतळ, उपहारगृह, सांस्कृतिक हॉल, विरंगुळा केंद्र, मैदान इत्यादीचे मा.आयुक्त सो. यांचेकडील परिपत्रक क्र.भूजि/१/कावि/१५६/२०१३ दि.२०/४/२०१३ अन्वये थेट पध्दतीने वितरीत करणेकामी निर्देश दिले आहेत. चिंचवड भाजी मंडई मधील चिंचवड मच्छी मार्केट मध्ये ओटयाची जागा भाडे तत्वावर मिळणेकामी

१.श्री.अनिरुध्द ज्ञानदेव जाधव यांनी दि.१४/०२/२०१८ चे पत्रान्वये ओटा क्र.१४
२.श्रीमती शबाना लतीफ मुलाणी यांनी दि.२०/२/२०१८ चे पत्रान्वये ओटा क्र.१५
३.श्री.इस्माईल चंदुलाल मुलाणी यांनी दि२०/२/२०१८ चे पत्रान्वये ओटा क्र.१६

वरील संबंधीतांनी ११ महिने कालावधीसाठी भाडेकरार करणेकामी विनंती केलेली आहे. उपसंचालक, नगररचना व विकास विभाग यांनी ठरवुन दिलेल्या प्रतिमहा भाडे प्रति ओटा दर र.रु.२३.५० प्रती चौ.फुट नुसार एकुण ३८.२४ चौरस फुटांचे ११ महिन्यांचे भाडे र.रु.९,८८९/-, GST (१८%) र.रु.१७८०/- व चार महिन्यांचे भाडे रक्कम अनामत र.रु.३५९६/- असे एकूण र.रु.१५,२६५/- त्यानुसार तीन संबंधीताचे र.रु.४५,७९५/- ब क्षेत्रीय कोषागरात भरुन घेण्यात आले आहे.करारनामा करुन चिंचवड भाजी मंडई आवारातील चिंचवड मच्छी मार्केट मधील मोकळा ओटा छप्पर नसलेले, पोटमाळा नसलेले ओटा क्र.१४,१५,१६ करारनामा करुन ११ महिन्याकरीता भाड्याने देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०७४ विषय क्रमांक - ०५
दिनांक – २९/०८/२०१८ विषय – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. मभां/६/कावि/३६९/२०१८ दि.१४/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे विद्युत विभागासाठी आवश्यक विविध प्रकारचे बॅलास्ट साहित्य खरेदीकामी ई निविदा सुचना क्र.51/1/2017-18 अन्वये, ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. यानुसार सदर निविदे करीता एकुण तीन निविदाकार प्राप्त झाले. निविदेतील प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.शक्ती फिक्चर्स प्रा.लि. यांचे प्राप्त लघुत्तम बाब क्र.1,2,5 व 6 याप्रमाणे एकुण 04 बाबी साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.6,35,150/- हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा -47.83% ने कमी असल्याने व मे.पायोनियर सेल्स यांचे प्राप्त लघुत्तम दर बाब क्र.3 व 4 याप्रमाणे एकुण 02 बाबी साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.12,52,000/- हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा -15.43% ने कमी असल्याने याप्रमाणे सदर एकुण लघुत्तम बाब क्र.1,2,3,4,5 व 6 या सर्व साहित्यांचे प्राप्त लघुत्तम दर एकुण र.रू.18,87,150/- हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा -30.05% ने कमी असल्याने स्विकृत करून त्यांचेबरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०७५ विषय क्रमांक - ०६
दिनांक – २९/०८/२०१८ विषय – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.कारिका लांडगे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.सहा. आयुक्त (भांडार) यांचे जावक क्र. मभां/८/कावि/१०८६/२०१८ दि.१३/०८/२०१८

मा.सहा. आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे विविध विभागासाठी आवश्यक छपाई साहित्याचा छपाई करुन पुरवठा करणेकामी ई नि.सु.क्र.42/2017-18 अन्वये लघुत्तम निविदाधारक १) मे.विशाल एंटरप्रायजेस यांचेकडील एकुण 05 बाबी छपाई साहित्य पुरविणेकामी एकुण र.रु.45,590/- २) मे.जयगणेश ऑफसेट पुणे यांचे कडील एकुण 03 बाबी छपाई साहित्य पुरविणेकामी एकुण र.रु.2,35,055/- ३) मे.श्री.साईश्रध्दा प्रिंटर्से यांचे कडील एकुण 06 बाबी छपाई साहित्य पुरवठा करणेकामी एकुण र.रु.2,50,266/- ४) मे.रिलायबल एंटरप्रायजेस यांचे 01 बाबी छपाई साहित्य एकुण र.रु.10,030/- असे एकुण 15 बाबी छपाई साहित्य एकुण र.रु.5,40,941/- (अक्षरी र.रु. पाच लाख चाळीस हजार नऊशे एक्केचाळीस फक्त) इतके दर लघुत्तम प्राप्त झाले असुन सदरचे दर स्विकृत करणेत आले आहेत. त्यानुसार चारही निविदाधारकानां विविध विभागासाठी आवश्यक छपाई साहित्याचा पुरवठा करणेकामी पुरवठा निर्गत करणेत आलेला आहे. सदर झालेल्या खर्च एकूण र.रु.5,40,941/- (अक्षरी र.रु. पाच लाख चाळीस हजार नऊशे एक्केचाळीस फक्त) चे खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०७६ विषय क्रमांक - ०७
दिनांक – २९/०८/२०१८ विषय – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.सहा. आयुक्त (भांडार) यांचे जावक क्र. मभां/८/कावि/१०८७/२०१८ दि.१३/०८/२०१८

मा.सहा. आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.महापालिका सभेने मंजुर केलेल्या अंदाजपत्रकात उपसुचना मोठ्या प्रमाणावर प्राप्त झालेल्या आहे. त्यानुसार सन 2018-19 ते अंदाजपत्रकात पुस्तक क्रं 1,2 व 3 ची पुनश्च: छपाई करुन घेणेकामी ई निविदा क्रं 37/2017-18 अन्वये प्राप्त लघुत्तम मंजुर दरानुसार निविदाकार मे ओम एंटरप्रायजेस प्राधिकरण, निगडी यांना आदेश क्रं मभां/8/कावि/ 596/2018 दिनांक 11/04/2018 अन्वये आवश्यक अंदाजपत्रक पुस्तके क्रं.01-50 प्रती पुस्तक क्रं.02-50 प्रति व पुस्तक क्रं 03-50 प्रति छपाई असे एकुण 150 पुस्तके छपाई करणेकामी एकुण र.रु.1,44,020/- आदेश निर्गत करणेत आला आहे. त्यानुसार मे ओम एंटरप्रायजेस प्राधिकरण, निगडी यांनी लेखा विभागाकडील मागणी प्रमाणे पुस्तके क्रं 01-50 प्रती पुस्तक क्रं 02-50 प्रति व पुस्तक क्रं 03-100 प्रति छपाई असे एकुण 200 पुस्तेकांचा पुरवठा केला आहे. त्यानुसार जादा झालेल्या एकुण

र.रु.46,639/- (अक्षरी र.रू.शेहचाळीस हजार सहाशे एकोणळीस फक्त) चे खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०७७ विषय क्रमांक - ०८

दिनांक – २९/०८/२०१८ विषय – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जावक क्र. मऔभां/१/कावि/११६/२०१८ दि.१४/०८/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

H1N1 (स्वाईन फ्ल्यु) आजाराचे रूग्णांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असुन त्यासाठी लागणारे Cap Oseltamivir 75mg या औषधाची तातडीक खरेदी करून म.न.पा. दवाखाने/ रूग्णालयांना पुरवठा करून कायम साठा उपलब्ध ठेवणेकामी तसेच रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणुन व तातडीची आवश्यकता लक्षात घेता मनपाकडील नोंदणीकृत निविदाधारक १) मे शशी एंटरप्रायजेस, चिंचवड २) मे रोहित एन्टरप्रायजेस, पुणे यांचेकडुन आवश्यकते प्रमाणे Cap Oseltamivir 75mg, १०००० गोळ्या (प्रती पॅकेट र.रू.३९८/-) (१० गोळ्या, GST करासहित) याप्रमाणे र.रू.३,९८,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख अठयान्नव हजार फक्त) खर्चास महापालिका अधिनियम अनुसुची ड, प्रकरण ५(२)(२) नुसार थेट पध्दतीने करारनामा करुन आवश्यकते प्रमाणे खरेदीकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०७८ विषय क्रमांक - ०९

दिनांक – २९/०८/२०१८ विषय – पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. पअक/१०/कावि/३९२/२०१८ दि.१०/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचार घेवून –

मा.आयुक्त सो यांचेकडील दि.१०/८/१८ रोजीचे मान्य प्रस्तावा नुसार मनपा कार्यक्षेत्रामध्ये मलशुध्दीकरण व्यवस्थेअंतर्गत दुरूस्ती व सुधारणा करणे, प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या कामाच्या पुर्नवापर करणेसाठी पॅकेज प्लॅन्ट करणे, नाल्यावरील प्रदुषित पाण्यावर प्रक्रिया करणेसाठी आवश्यक कामेकरणे तसेच सीईटीपी (CETP) करणे इ. नमुद कामे करणेसाठी आवश्यक ते डिझाईन तयार करणे, विविध बाबींचे दर पृथ्थकरण, अंदाजपत्रक, दरपत्रक तयार करणे व या कामास तांत्रिक मान्यता घेणे इत्यादी कामे करून घेणे आवश्यक आहे. मे.आय.ई.वल्ड प्रा.लि.(मे.युनिटी) यांनी यापुर्वी जलनिसारण विभागाअंतर्गत शहरातील पंपींग

स्टेशन व मैलाशुध्दीकरण केंद्रे बाबतचे कामकाज व्यवस्थितरित्या पूर्ण केले असलेने मनपाच्या सद्यास्थितीच्या माहाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे दि.४ जून २०१८ रोजीच्या प्रकल्प सल्लागार नेमणूकीसाठी निश्चित केलेल्या दरानुसार निविदा पुर्व कामासाठी ०.५०% व निविदा पश्चात कामासाठी १.५०% दराने मनपाच्या जलनिसारण विभागाच्या पॅनलवरील मे.आय.ई.वल्ड प्रा.लि.(मे.युनिटी कन्सलटंट) यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेस तसेच प्रस्तुत विषयातील मे.आय.ई.वल्ड प्रा.लि.(मे.युनिटी कन्सलटंट) यांची पर्यावरण विभागातील कामकाजासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०७९ विषय क्रमांक - १०

दिनांक – २९/०८/२०१८ विषय – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र. मुलेप/६/कावि/१३३/२०१८ दि.१६/०८/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.३०/०७/२०१८ ते दि.०५/०८/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१३३/२०१८ दि.१६/०८/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०८० विषय क्रमांक - ११

दिनांक – २९/०८/२०१८ विषय – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र. मुलेप/६/कावि/१३२/२०१८ दि.१६/०८/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२३/०७/२०१८ ते दि.२९/०७/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१३२/२०१८ दि.१६/०८/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३०८१ विषय क्रमांक - १२

दिनांक – २९/०८/२०१८

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा. विलास मडिगेरी

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.विलास मडिगेरी यांचा प्रस्ताव -

रोटरी क्लब ऑफ चिंचवड, पुणे यांचे मार्फत बालेवाडी क्रिडासंकुल या ठिकाणी दि.२४/०८/२०१८ ते दि.२६/०८/२०१८ या कालावधीत स्वमग्न मुलांची (Autistic Children) पहिली राष्ट्रीय जलतरण स्पर्धा आयोजित करणेत आली आहे सदर स्पर्धेसाठी मनपा मार्फत र.रू.२,९९,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख नव्याण्णव हजार फक्त) इतकी मदत देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/१०३८/२०१८
दिनांक - ३०/०८/२०१८



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.